# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र-१५१** **दिनांक - १९/०४/२०२४**

**देशी बनावटीचे रिव्हॉल्वर जवळ बाळगणाऱ्या आरोपीतास अटक करण्यास पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकास यश.**

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दि. १८/०४/२०२४ रोजी १७.३० वा. च्या सुमारास जाबरपाडा, पेल्हार गाव, नालासोपारा पुर्व ता. वसई जि. पालघर या ठिकाणी एक इसम रिव्हॉल्वर घेवुन येणार असल्याची खात्रीशीर माहीती गुप्त बातमीदारामार्फत प्राप्त झाली होती. सदर बाबत गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/सोपान पाटील यांनी पेल्हार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र वनकोटी यांना सदर माहिती दिली असता त्यांनी बातमीची सत्यता पडताळुन कायदेशिर कारवाई करण्याबाबत आदेश व सुचनापर मार्गदर्शन केले होते.

सदर आदेशान्वये गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/सोपान पाटील, पोउपनिरी/तुकाराम भोपळे, व पथक यांनी सापळा रचुन बेकायदेशिर अवैध अग्निशस्त्र बाळगणारा इसम - इरफान अज्वर खान, वय २७ वर्षे, नालासोपारा पुर्व ता. वसई जि. पालघर यास ताब्यात घेऊन त्याची दोन पंचासमक्ष अंगझडती घेतली असता त्याच्या ताब्यात ३५,०००/- रु.किं.चे एक देशी बनावटीचे रिव्हॉल्वर मिळुन आले असुन सदर बाबत पेल्हार पोलीस ठाणे येथे गु. र. क्र. ४१३/२०२४ भारतीय हत्यार कायदा ३, २५ सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३),१३५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ ३, विरार, श्री. बजरंग देसाई, सहायक पोलीस आयुक्त सो, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. जितेंद्र वनकोटी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. कुमारगौरव धादवड, पोलीस निरीक्षक (गुन्हे), शकील शेख, पोलीस निरीक्षक (प्रशासन), पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/सोपान पाटील, पोउपनिरी/तुकाराम भोपळे, पोहवा/योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, वाल्मिक पाटील, पो.अं./रवि वानखेडे, किरण आव्हाड, संजय मासाळ, राहुल कर्पे, दिलदार शेख, अनिल साबळे, शरद राठोड, सुजय पाटील, सर्व नेम. पेल्हार पोलीस ठाणे यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.